O/C

।। जय महाराष्ट्र ।।

# सौ. निशा नरेश नार्वेकर

शिव सेना

जिल्हा संघटक

दिनांक : १५ जून २०२६

१५/०६/२०२६
महाराष्ट्र राज्य महिला आयोग, गृहनिर्माण भवन, पोटमाळा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

प्रति,

मा. अध्यक्षा, सदस्य सचिव

महाराष्ट्र राज्य महिला आयोग,

मुंबई - ४०००५१

**विषय : मीरा-भाईंदर शहरातील महिलांवरील अत्याचार, भाजपाचे लोकप्रतिनिधी आणि त्यांचा गुन्हेगारांना असणारा राजाश्रय तसेच वाढत्या महिलांवरील अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करून अत्याचारग्रस्त महिलांना न्याय मिळवून देण्याबाबत...**

महोदया,

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मागील दोन महिन्यात भाजपा कार्यकर्ता आणि नगरसेवक यांच्यावर महिला लैंगिक अत्याचाराचे तीन वेगवेगळे गुन्हे दाखल झालेले आहेत. हि अत्यंत दुर्दैवी बाब असून, विशेषतः सुरक्षिततेच्या बाबतीत महिला अत्यंत भयभीत झालेल्या आहेत. महिलांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होणे हि मिरा-भाईंदर शहरासाठी अत्यंत लाजिरवाणी बाब आहे.

**मागील दोन महिन्यात अत्याचाराच्या घटना खालील प्रमाणे आहेत :**

१.**आरोपी गंगेश श्यामसुंदर झा** यांच्यावर गोराई पोलीस ठाणे येथे FIR नं. ०१२२/२०२६ दि. ०६/०६/२०२६ रोजी भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत ६४ (१), ३५१ (२) अन्वये महिला लैंगिक अत्याचाराबाबत गुन्हा दाखल झालेला आहे. **सदरचा आरोपी हा भारतीय जनता युवामोर्चाचा जिल्हा उपाध्यक्ष** या पदावर कार्यरत आहे.

२.**आरोपी राजेश चौहान** यांच्यावर काशिमिरा पोलीस ठाणे येथे FIR नं. ०२७८/२०२६ दि. ०५/०६/२०२६ रोजी **भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत ६४, ६४ (२) (एम), ७४, ११५ (२), ३५१ (२) व बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, २०१२ अंतर्गत कलम ४,६,८,१२ (पोस्को) या अंतर्गत अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचाराचा गुन्हा** दाखल झालेला आहे. **सदरचा आरोपी हा भाजपा महिला नगरसेविका श्रीमती अनिता पाटील यांचा सख्खा लहान भाऊ असून सध्या श्रीमती अनिता पाटील या मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण समितीच्या अध्यक्षपदी विराजमान** आहेत. सदर प्रकरण दडपण्यासाठी त्या काशिमिरा पोलीस ठाण्याच्या तपास अधिकाऱ्यांवर दडपण आणत आहेत.

३.**आरोपी लक्ष्मण गणपत जंगम** यांच्यावर मीरा रोड पोलीस ठाणे येथे FIR नं. १४६/२०२६ दि. २१/०४/२०२६ रोजी **भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ६९,३५१ (२), ४९६ महिला लैंगिक अत्याचाराबाबत गुन्हा दाखल** झालेला आहे. **सदर आरोपी हा मिरा-भाईंदर महानगरपालिकेत भाजपा नगरसेवक पदी कार्यरत** आहे.

**महिला अत्याचारासंदर्भात अत्यंत गंभीर बाब म्हणजे, मिरा-भाईंदरचे भाजपा आमदार श्री. नरेंद्र लालचंद मेहता** यांच्यावर त्यांच्याच पक्षाच्या नगरसेविका यांनी फेब्रुवारी २०२० रोजी मिरा पोलीस ठाणे येथे FIR नं. ४४/२०२० **आय.पी.सी. कलम ३७६ (२) (एन), ३७६ (सी), ४९६, ४१७, ३२३, ५०४, ५०६, ३४ of IPC and sec. ३ (१) (w), ३ (R) (s), ३ (२) (५) सह SC/ST कायद्याअंतर्गत महिला लैंगिक अत्याचाराबाबत गुन्हा दाखल** केलेला आहे.

**यापूर्वी हि अनेक मिरा-भाईंदर भाजपा नगरसेवकांवर महिलांवर अत्याचार प्रकरणी अनेक गुन्हे विविध पोलीस ठाण्यात दाखल आहेत. ते खालील प्रमाणे :**

१.**आरोपी अनिल बाबुराव भोसले** यांच्यावर काशिमिरा पोलीस ठाणे येथे FIR नं. २९/२०१७ दि. जुलै २०१७ रोजी **आय.पी.सी. कलम ३७६ (एन), ३७७, ५०६ अंतर्गत महिला लैंगिक अत्याचाराबाबत गुन्हा दाखल** झालेला आहे. **सदरचा आरोपी हा भारतीय जनता पक्षाच्या विद्यमान नगरसेवक पदी कार्यरत** आहे.

२.**आरोपी नवीन गुप्तेश्वर सिंह** यांच्यावर काशिमिरा पोलीस ठाणे येथे FIR नं. ६२६/२०२२ आय.पी.सी. कलम **३७६, ३७६(२) (एन), ३७७,३१३,५०४,५०६ अंतर्गत गुन्हा दाखल असून सध्या ठाणे सत्र न्यायलयात पोलिसांकडून "A" summary report दाखल असून सध्या हे प्रकरण प्रलंबित आहे. सदरचा आरोपी हा भारतीय जनता पक्षाच्या विद्यमान नगरसेवक पदी कार्यरत** आहे.

३.**आरोपी संजय वसंत थरथरे** यांच्यावर मिरा पोलीस ठाणे येथे FIR नं. ४४/२०२० **आय.पी.सी. कलम ३७६ (२) (एन), ३७६ (सी), ४९६, ४१७, ३२३, ५०४, ५०६, ३४ of IPC and sec. ३ (१) (w), ३ (R) (s), ३ (२) (५) अंतर्गत महिला लैंगिक अत्याचाराबाबत गुन्हा दाखल झालेला आहे. सदरचा आरोपी हा भारतीय जनता पक्षाच्या विद्यमान नगरसेवक पदी कार्यरत** आहे.

४.**आरोपी दिनेश तेजराम जैन** यांच्यावर मिरा-भाईंदर हद्दीतील पोलीस ठाणे येथे FIR नं. ३३२/२०१९ **आय.पी.सी. कलम ३५४ अंतर्गत महिला लैंगिक अत्याचाराबाबत गुन्हा दाखल झालेला आहे. सदरचा आरोपी हा भारतीय जनता पक्षाच्या विद्यमान नगरसेवक पदी कार्यरत** आहे.

५.**आरोपी प्रशांत दळवी"** यांच्यावर मिराभाईदर हद्दीतील पोलिस ठाणे येथे FIR नं. १३४/२०२० **आय.पी.सी. ३७६ (२) (एन), ३७६ (सी), ४९६ अंतर्गत महिला लैंगिक अत्याचाराबाबत गुन्हा दाखल झालेला आहे. सदरचा आरोपी हा भारतीय जनता पक्षाच्या विद्यमान नगरसेवक पदी कार्यरत** आहे.

।। जय महाराष्ट्र ।।
# सौ. निशा नरेश नार्वेकर
शिव सेना
जिल्हा संघटक

याचसोबत **भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी असलेले अरविंद शेट्टी, विद्यमान नगरसेवक गणेश शेट्टी आणि यशवंत कांगणे यांचे देखील लॉजिंग - बोर्डिंग तसेच लेडीज बार यांसारखे अनैतिक व्यवसाय सुरू असून लेडीज बार संदर्भात त्यांच्याच व्यवसायातील कर्मचाऱ्यांवर पिटा कायद्याअंतर्गत गुन्हे देखिल दाखल** आहेत. यावर देखील आपण चौकशी करून योग्य ती कारवाई करावी.

सर्वात गंभीर बाब म्हणजे, खंडणीसारखे गंभीर गुन्हे दाखल असणारे आरोपी देखील यांचे नगरसेवक आहेत आणि अशाच गंभीरकृत्य करणाऱ्या नगरसेवकांचा जामीन मिळवून देण्यासाठी खंडणीखोर, वादग्रस्त असणारे भारतीय जनता पक्षाचे विद्यमान नगरसेवक ॲड. तरुण शर्मा हे धावपळ करून भारतीय जनता पक्षाच्या आरोपी नगरसेवकांना जामिन मिळवून देतात आणि गंभीर गुन्हे असणाऱ्या नगरसेवकांना पाठीशी घालण्याचे काम करतात. त्यामुळे त्यांच्यावर देखील कारवाई झाली पाहिजे.

भारतीय जनता पक्षाच्या आजी - माजी नगरसेवकांवर असे गुन्हे असताना आता मात्र कहरच झाला. भारतीय जनता पक्षाच्या विद्यमान नगरसेविका अनिता पाटील यांनी तर लैंगिक शोषणाला साथ देऊन स्वतःच्या दोन भावांच्या माध्यमातून एका अल्पवयीन मुलीचे लैंगिक शोषण होत असताना पाहून, वारंवार त्या अल्पवयीन मुलीने अनिता पाटील यांना तिच्यावर होणाऱ्या अत्याचाराची माहिती देऊनही त्यांनी आपल्या दोन्ही भावांना पाठीशी घातले आहे. त्यामुळे त्या अल्पवयीन मुलीवर सातत्याने अत्याचार होतचं राहिला. तसेच सत्ताधारी असलेल्या या भारतीय जनात पक्षाच्या लोकप्रतिनिधींना काही वेळा पोलिस ही वाचविण्यांचा प्रयत्न करतात त्यामुळे या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन या सर्व प्रकाराची आपण स्वतः चौकशी करावी व मिरा - भाईंदर शहरात भारतीय जनता पक्षाच्या या लोकप्रतिनिधींकडून भविष्यात वारंवार महिला अत्याचार होणार नाही, याची काळजी घ्यावी व तश्या सूचना संबंधित पोलिस अधिकाऱ्यांना हि द्याव्यात.

या सर्व पार्श्वभूमीवर सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या लोकप्रतिनिधींनी सातत्याने महिलांवर केलेल्या अत्याचारांची गंभीर दखल घेऊन *अनिता पाटील आणि त्यांच्या दोन्ही भावांची हि संघटीत गुन्हेगारी असल्याने आपण अनिता पाटील यांना "सहआरोपी" घोषित मोका कायद्यांतर्गत कारवाई करावी, अशी आम्ही आपणास मागणी करत आहोत. आपण या प्रकरणात स्वतः जातीने लक्ष देऊन पिडीत अल्पवयीन मुलीला योग्य न्याय मिळवून द्याल आशी आशा बाळगते.

आपली विश्वासू,

(निशा नार्वेकर)

कार्यालय :- शाखा क्र. १२, रामदेव पार्क चौक, मिरारोड (पू), जि.ठाणे - ४०११०७. मोबा. ८७७९७१३१०३